दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ गुरूवार, दि. ११ जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ५२ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## वरुणराजाचे आगमन आणि आव्हानांचे 72 तास

केरळमध्ये वेळेवर दाखल झाल्यानंतर मान्सूनने महाराष्ट्रातही दमदार हजेरी लावली आहे आणि आता त्याची पुढची वाटचाल वेगाने सुरू आहे. एकीकडे उन्हाच्या तीव्र झळांनी होरपळलेल्या धरणीला शांत करण्यासाठी वरुणराजाचे हे आगमन सुखावह वाटत असले, तरी दुसरीकडे भारतीय हवामान खात्याने जारी...

---> अग्रलेख - पान 2 वर

## सख्ख्या बहिणींनी जिद्द सोडली नाही; आज एक IAS तर दुसरी IPS

**कड्डलोर :** तामिळनाडूच्या कड्डलोर जिल्ह्यातील एका सामान्य शेतकऱ्याच्या सुष्मिता आणि ईश्वर्या रामनाथन या दोन्ही मुलींनी यूपीएससी (UPSC) सारखी अत्यंत कठीण परीक्षा उत्तीर्ण करून आयएएस (IAS) आणि आयपीएस (IPS) अधिकारी बनण्याचा बहुमान मिळवला आहे. ईश्वर्याने २०१९ मध्ये देशात ४४ वी रँक मिळवून आयएएस पद मिळवलं, तर सुष्मिताने सलग सहा प्रयत्नांनंतर २०२२ मध्ये ५२८ व्या रँकसह आयपीएस अधिकारी होण्याचं आपलं स्वप्न पूर्ण केलं.

# कोट्यवधींच्या ठेवींवर ऑडिटची नजर; संभाजीनगरातील 423 पतसंस्थांची आर्थिक कसोटी

## ठेवीदारांचा विश्वास टिकविण्याचे आव्हान; पारदर्शकितेसाठी सहकार विभागाची कडक भूमिका

हिंदू प्रकाशवार्ता : सिद्धेश्वर थोर

**छत्रपती संभाजीनगर :** सामान्य नागरिकांच्या घामाच्या पैशातून उभ्या राहिलेल्या आणि ग्रामीण-शहरी अर्थव्यवस्थेला आधार देणाऱ्या छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील ४२३ सहकारी पतसंस्था सध्या वार्षिक लेखापरीक्षणाच्या (ऑडिट) प्रक्रियेतून जात आहेत. ठेवीदारांच्या पैशांची सुरक्षितता, कर्जवाटपातील शिस्त आणि आर्थिक व्यवहारांतील पारदर्शकता याची खातरजमा करण्यासाठी सहकार विभागाने लेखापरीक्षण प्रक्रियेवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

गेल्या काही वर्षांत राज्यातील काही सहकारी संस्थांमधील गैरव्यवहारांमुळे ठेवीदारांच्या मनात निर्माण झालेल्या शंकांच्या पार्श्वभूमीवर लेखापरीक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे प्रत्येक पतसंस्थेच्या आर्थिक आरोग्याची तपासणी आता अधिक काटेकोरपणे केली जात आहे.

तालुक्यात कार्यरत असलेल्या नागरी, नोकरदार, महिला आणि विविध व्यावसायिक पतसंस्थांमधून हजारो सभासद आर्थिक व्यवहार करतात. शेतकरी, लघुउद्योजक, व्यापारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांना कर्जपुरवठा व बचतीची सुविधा उपलब्ध करून देण्यात या संस्थांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे या संस्थांवरील नागरिकांचा विश्वास टिकवून ठेवणे ही सहकार यंत्रणेची मोठी जबाबदारी बनली आहे.

सहकार कायद्यानुसार प्रत्येक पतसंस्थेचे दरवर्षी वैधानिक लेखापरीक्षण करणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष ३१ मार्च रोजी संपल्यानंतर एप्रिल ते जुलै या कालावधीत लेखापरीक्षणाची प्रक्रिया राबविली जाते. या कालावधीत संस्थांनी आपले हिशोब, आर्थिक अहवाल, कर्जवाटपाची माहिती आणि इतर आवश्यक कागदपत्रे लेखापरीक्षकांकडे सादर करणे अपेक्षित असते.

यासाठी शासनमान्य लेखापरीक्षकांची नियुक्ती केली

-> पान 2 वर

### ऑडिट न केल्यास काय होऊ शकते?

- सहकार विभागाकडून नोटीस बजावली जाऊ शकते.
- संस्थेचे वर्गीकन प्रभावित होऊ शकते.
- संचालक मंडळावर जबाबदारी निश्चित केली जाऊ शकते.
- विशेष चौकशी किंवा प्रशासकीय कारवाई होऊ शकते.
- गंभीर प्रकरणांत प्रशासक नेमण्याची कारवाई होऊ शकते.



### ऑडिटचा कालावधी

- आर्थिक वर्ष समाप्ती : ३१ मार्च
- ऑडिट प्रक्रिया : एप्रिल ते जुलै
- शासनमान्य लेखापरीक्षकांकडून तपासणी
- दोषदुरुस्ती अहवाल सादर करणे बंधनकारक
- ऑडिट अहवालाच्या आधारे 'अ', 'ब', 'क', 'ड' वर्गांकन

### ऑडिट का महत्त्वाचे?

- आर्थिक व्यवहारांची पारदर्शकता तपासली जाते.
- ठेवीदारांच्या पैशांची सुरक्षितता सुनिश्चित होते.
- कर्जवाटपातील नियमभंग उघडकीस येतो.
- थकीत कर्जे आणि आर्थिक जोखमींचा आढावा घेतला जातो.
- संस्थेची आर्थिक विश्वासार्हता वाढते.

## थोडक्यात वार्ता

### हमाल पंचायत नेत्याच्या घरात घुसून 14 वर्षीय नातवाला मारली गोळी

**सांगली :** रेल्वेच्या मालधक्का ठेक्यावरून दोन गटात धुमसत असलेल्या वादातून हमाल पंचायतीचे नेते बाळासाहेब बंडगर यांना मारण्यासाठी आलेल्या संशयिताने त्यांचा नातू वेदांत मारूती बंडगर (वय १४) याच्या डोळ्यात गोळी झाडून निर्घृण खून केला. सायंकाळी साडे सहाच्या सुमारास अभयनगर एसटी कॉलनी येथे ही घटना घडली. एका निष्पाप मुलाचा संशयितांनी गोळी झाडून खून केल्याच्या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पोलिस फौजफाटा तातडीने घटनास्थळी दाखल झाला.

### कंपनीतील सहकाऱ्यांवर मानसिक छळाचा आरोप

**पिंपरी :** हिंजवडीतील आयटी कंपनीमधील कर्मचाऱ्याने घरी आत्महत्या केली. सततचा मानसिक छळ, खोट्या तक्रारी आणि कामाच्या ठिकाणी होणारा अपमान यामुळेच आपण हे टोकाचे पाऊल उचलत असल्याचा उल्लेख संबंधित कर्मचाऱ्याने सुसाइड नोटमध्ये केल्याचा दावा कुटुंबीयांनी केला आहे. अमित अभय ब्रह्मे (वय ४८) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. विनोद जेठालाल पालीचा तसेच हिंजवडीतील टीसीएस कंपनीमधील अर्चना आणि शाश्वती या कर्मचाऱ्यांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. अमित यांचा मुलगा अनिश ब्रह्मे (वय १९, रा. भोसरी) याने ९ जून रोजी याबाबत भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

### तृणमूल काँग्रेसच्या नेत्याची पोलिसांनी काढली धिंड



**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सत्तांतर झाल्यापासून तृणमूल काँग्रेसच्या अनेक नेत्यांविरोधात कारवाई सुरू आहे. याचदरम्यान,तृणमूल काँग्रेसचे नेते आणि फाल्टा येथून निवडणूक लढवणारे आणि नंतर ऐनवेळी माघार घेणारे उमेदवार जहांगीर खान यांना नुकतीच नेपाळच्या सीमेवरून अटक करण्यात आली होती. त्यानंतर आता जहांगीर खान यांची पोलिसांनी हाफ पँट आणि टी-शर्टवर रस्त्यावर चालवून धिंड काढली. याचा एक व्हिडीओही समोर आला आहे. यावर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीसाठी तृणमूल काँग्रेसने फाल्टा येथून उमेदवारी दिली होती. मात्र मोठ्या प्रमाणावर गडबड होत असल्याच्या कारणामुळे येथील निवडणूक रद्द करून पुढे ढकलण्यात आली होती. दरम्यान, जहांगीर खान यांनी निवडणुकीतून माघार घेतली होती. त्यानंतर काही दिवसांपूर्वी जहांगीर खान यांना नेपाळच्या सीमेजवळून अटक करण्यात आली होती. देश सोडून पळण्याच्या तयारीत असलेल्या जहांगीर खान यांना पश्चिम पोलिसांच्या एसटीएफने नेपाळच्या सीमेजवळून ताब्यात घेतले होते.

### आज रात्री इराणवर करणार मोठा हल्ला; ट्रम्प यांची धमकी

**वॉशिंग्टन :** अमेरिका-इराण युद्ध आता आणखी पेटण्याची चिन्हे आहेत. अमेरिकेने इराणवरील हल्ल्यासंदर्भात एक मोठे निवेदन जारी केले आहे. ११ जूनच्या रात्री म्हणजेच आज इराणवर मोठा हल्ला केला जाईल असं राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. ट्रम्प यांनी हल्ल्याच्या काही तास आधीच ही धमकी दिली आहे. त्यांनी आपल्या सोशल मीडियात हल्ल्याबाबत पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलंय की, अमेरिका आज रात्री इराणवर एक मोठा हल्ला करेल. इराणचे नौदल, हवाई दल, रडार, एंटी एअरक्राफ्ट आणि संरक्षण यंत्रणेसह त्यांची बहुतेक हल्ला करण्याची क्षमता नष्ट करण्यात आली आहे.

## शरद पवारांच्या NCP पक्षाला काँग्रेसकडून विलीनीकरणाची ऑफर?

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगालच्या निवडणुकीतील पराभवानंतर तृणमूल काँग्रेसचे बहुतांश आमदार आणि खासदार बंडखोर झाले आहेत. या आमदार-खासदारांनी स्वतंत्र गट बनवला आहे. त्यात काँग्रेसनेममता बॅनर्जी यांच्या टीएमसीला पक्षात विलीनीकरणाची ऑफर दिल्याची चर्चा होती. मात्र या चर्चा दोन्ही पक्षाच्या नेत्यांकडून फेटाळण्यात आल्या. परंतु आता काँग्रेसने शरद पवारांच्या राष्ट्रवादीला विलीनीकरणाची ऑफर दिल्याचं समोर आले आहे.

देशाच्या राजकारणात विरोधी पक्षांमध्ये सुरू असलेल्या राजकीय उलथापालथीत काँग्रेसने शरद पवारांच्या राष्ट्रवादीला विलीनीकरणाचा प्रस्ताव दिला आहे असं सूत्रांच्या हवाल्याने सीएनएन वृत्तवाहिनीने बातमी दिली. अद्याप शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून या प्रस्तावावर भूमिका स्पष्ट करण्यात आली नाही. परंतु येणाऱ्या काळात याबाबत मोठा निर्णय होऊ शकतो.

# 150 हून अधिक कृषी सेवा केंद्रांचे परवाने तडकाफडकी निलंबित

## शहरातील 92 केंद्रांचा समावेश, चौघांविरुद्ध गुन्हे दाखल; कलेक्टरने कान उपटल्यानंतर कृषी विभागाची कारवाई

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** बनावट खतविक्री करणे, एमआरपीपेक्षा जादा भावाने खत विकणे, पक्के बील न देणे, परवाना नसतानाही खत विक्री करणे यांसारख्या गंभीर प्रकरणात कृषी विभागाने छत्रपती संभाजीनगरसह जालना आणि बीड या तीन जिल्ह्यांतील १५० हून अधिक कृषी सेवा केंद्रांचे परवाने निलंबित केले आहेत. महत्त्वाचे म्हणजे विभागात ७ कृषी विक्रेत्यांचे परवाने कायमचे रद्दबातल, तर ३ कृषी सेवा केंद्राविरोधात थेट पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

एकीकडे ऑनलाईन अॅपवर खत खरेदी डोकेदुखी ठरत असून, शेतकऱ्यांना खत मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत आहेत, तर दुसरीकडे कृषी सेवा केंद्रांकडूनही शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याचे उघडकीस येत आहे. यामुळे कृषी विभागही आता अंग झटकून कामाला लागला असून, छत्रपती संभाजीनगर विभागांतर्गत कारवाईचा धडाका सुरू करण्यात आला आहे. कागदोपत्री कारवायांचा आकडा १७५ वर गेला असून, याव्यतिरिक्त तक्रार देण्यासाठी पुढे न आलेल्या शेतकऱ्यांचा आकडा दुप्पट असल्याची माहिती कृषी विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

### कुठे किती परवाने निलंबित?

| जिल्हा | निलंबित | कायमचे रद्द | गुन्हे दाखल |
|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | ९२ | ०४ | ०३ |
| जालना | ३७ | ०३ | ०२ |
| बीड | ३२ | ०० | ०० |

**...तेव्हा कुठे विभागाने झटकले अंग**

मान्सून येण्याअगोरदच शेतकऱ्यांची पेरणीसाठी शेताची मशागत करणे, पेरणीसाठी खते, बियाण्यांची खरेदी करण्याच्या कामांची लगबग सुरू होते. परंतु, अनेकदा या लगबगीचा फायदा घेऊन शेतकऱ्यांच्या माथी बनावट खते मारत त्यांची लूट होत असल्याच्या घटना समोर आल्या होत्या.

# परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात मच्छीमारांचा सामूहिक आत्मदहनाचा प्रयत्न

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**परभणी :** प्रशासकीय फसवणूक, मत्स्यव्यवसाय विभागाची अनास्था आणि कामगार कायद्याचे होणारे उल्लंघन याला कंटाळून जिंतूर तालुक्यातील सावंगी माळसा येथील मच्छीमारांनी परभणी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात सामूहिक आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. दुपारी तीन वाजेच्या सुमारास हा सर्व प्रकार घडला असून, तिथे उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या



तत्परतेमुळे अत्यंत मोठा अनर्थ टळला आहे. पोलिसांनी सर्व आंदोलनकर्त्यांना ताब्यात घेऊन पुढील कारवाई सुरू केली आहे.

सावंगी माळसा येथील मच्छीमार कुटुंबीयांना स्वर्गीय राजीव गांधी मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था बामणी यांच्याकडून मासेमारीचे परवाने नाकारण्यात आले होते. मत्स्यव्यवसाय विभागाने जाचक अटी लावून कामगार कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप पीडित मच्छीमारांनी केला आहे. या वादातूनच जानेवारी महिन्यात संबंधितांवर जीवघेणा हल्ला देखील झाला होता, ज्याची नोंद सेनगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली होती. न्याय मिळत नसल्याने प्रवीण मारुती जाधव, गौतम दशरथ गवळी, स्वप्नील वाटोळे, योगेश गुलाब तारे, अमोल गुलाब बचाटे आणि मनीष लाटे या मच्छीमारांनी प्रशासनाला आत्मदहनाचा इशारा दिला होता. यापूर्वी सहायक आयुक्त मत्स्य व्यवसाय यांनी पंधरा दिवसांत बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते, ज्यामुळे मच्छीमारांनी आपले आंदोलन मागे घेतले होते.

## पेपर फुटला तर विद्यार्थ्याला 10 हजारांची भरपाई द्या

### कॉक्रोज जनता पार्टीच्या अभिजित दीपकेंची मागणी

**पुणे :** नीट परीक्षा आणि शिक्षण व्यवस्थेतील कथित भ्रष्टाचाराविरोधात 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या वतीने आज पुण्यात तीव्र आंदोलन करण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुरू असलेल्या या आंदोलनाला विद्यार्थी, पालक तसेच विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. आंदोलनस्थळी उपस्थित नागरिकांनी शिक्षण व्यवस्थेतील त्रुटी, परीक्षा प्रक्रियेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींबाबत आपली मते मांडली.

## हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधीने टिपलेले छायाचित्र



**छत्रपती संभाजीनगर : "भंगाराचा डोंगर, नियमांचा चुराडा! भररस्त्यातून सुरू असलेल्या या धोकादायक वाहतुकीने शहरातील रस्ते सुरक्षिततेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उभे केले आहे."वाहतूक पोलिसांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.**

# चारित्र्याच्या संशयावरुन पतीने केली पत्नीची निर्घृण हत्या

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

**परभणी :** तालुक्यातील ब्राह्मणगाव येथील शेत शिवारात चारित्र्याच्या संशयावरून पतीने आपल्या पत्नीची काठीने बेदम मारहाण करून निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात पतीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप आणि खळबळ उडाली आहे.

राजश्री कैलास कुलकर्णी असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ब्राह्मणगाव येथील शेत शिवारात पती कैलास कुलकर्णी याने पत्नी राजश्रीच्या चारित्र्यावर संशय घेऊन वाद घालण्यास सुरुवात केली.



हा वाद इतका विकोपाला गेला की, कैलासने हातातील काठीने राजश्रीच्या डोक्यावर, नाकावर आणि पोटावर जबर प्रहार केले. या गंभीर मारहाणीत राजश्री रक्तबंबाळ होऊन जमिनीवर कोसळली आणि गंभीर जखमी झाली.

या घटनेची माहिती मयत राजश्रीचे भाऊ अर्जुन देशमुख यांना एका ग्रामस्थाने फोनवरून दिली. त्यांची बहीण गंभीर जखमी अवस्थेत शेतातील रस्त्यावर पडल्याचे समजताच त्यांनी नातेवाईकांसह तातडीने ब्राह्मणगाव येथील शेत आकड्यावर धाव घेतली. राजश्री अत्यवस्थ अवस्थेत जमिनीवर पडलेली दिसताच तिला तातडीने उपचारासाठी परभणी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तिथे तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

या अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र शिरतोडे, पोलीस निरीक्षक सुरेश थोरात आणि पोलीस पाटील विकास सोनवणे यांनी तातडीने घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. मयताच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी पती कैलास कुलकर्णी याच्याविरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस निरीक्षक सुरेश थोरात या प्रकरणाचा पुढील सखोल तपास करत आहेत.

# 'मला वाचवा' अशी हाक देणाऱ्या शिक्षकाचा मृत्यू; पत्नीच्या फिर्यादीवरून अज्ञातांविरुद्ध गुन्हा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** वेरूळ येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील शिक्षक सुरेश बोरसे यांच्या मृत्यूप्रकरणी त्यांच्या पत्नीने केलेल्या फिर्यादीवरून खुलताबाद पोलीस ठाण्यात अज्ञात सात ते आठ व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वतःला पोलीस असल्याचे सांगणाऱ्या व्यक्तींनी पतीला मारहाण केल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप फिर्यादी अनिता सुरेश बोरसे यांनी केला आहे.

खुलताबाद पोलिसांत दाखल फिर्यादीनुसार, सुरेश बोरसे हे १० जून रोजी रात्री कुटुंबीयांसोबत जेवण केल्यानंतर त्यांचा भाचा वरद विजय



महाजन याच्यासोबत घराबाहेर गेले होते. आईस्क्रीम आणणे तसेच औषध घेणे, या कारणासाठी ते बाहेर पडल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

रात्री सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास गल्लीत आरडाओरडा ऐकू आल्यानंतर वरद महाजन याने घरी येऊन "मामांना कोणीतरी मारत असून गाडीत घेऊन जात आहे," अशी माहिती दिली. त्यानंतर अनिता बोरसे व त्यांच्या मुली घटनास्थळी गेल्या असता तेथे नंबर प्लेट नसलेली काळ्या रंगाची स्कॉर्पिओ आणि पांढऱ्या रंगाची कार उभी असल्याचे दिसल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पांढऱ्या रंगाच्या कारवर 'पोलीस' अशी पाटी असल्याचाही उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, सुरेश बोरसे यांना स्कॉर्पिओच्या मधल्या सीटवर बसविण्यात आले होते आणि त्यांच्या आजूबाजूला दोन व्यक्तींनी त्यांना पकडून ठेवले होते. त्यावेळी त्यांनी "मला वाचवा" अशी हाक दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

अनिता बोरसे व त्यांच्या मुलींनी विचारणा केली असता, तेथील एका व्यक्तीने "आम्ही पोलीस आहोत. या इसमाने आमच्या कामात दखल दिली म्हणून आम्ही त्यांना घेऊन चाललो आहोत. तुम्ही बाजूला व्हा, अन्यथा तुमच्यावरही सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी कारवाई करू," असे सांगितल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

तक्रारीनुसार, कुटुंबीयांनी सुरेश बोरसे यांना वाहनातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांना श्वास घेण्यास त्रास होत होता. कुटुंबीयांनी त्यांना हात धरून बाहेर ओढल्यानंतर ते खाली बसले आणि त्यांच्यात कोणतीही हालचाल दिसत नसल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

यानंतर त्यांना तातडीने दवाखान्यात घेऊन जाण्याची विनंती करण्यात आली. मात्र, संबंधित व्यक्तींनी "हे काम आमचे नाही," असे सांगून दोन्ही वाहनांमधील लोक तेथून निघून गेल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

### गुन्हा दाखल करण्यासाठी अंबादास दानवे यांची मागणी

**शिक्षक सुरेश बोरसे यांच्या मृत्यूप्रकरणी वेरूळ येथे नागरिकांनी केलेल्या चक्काजाम आंदोलनात सहभागी होत आमदार अंबादास दानवे यांनी संबंधितांवर तातडीने गुन्हा दाखल करून दोषींना अटक करण्याची मागणी केली होती. घटनेची सखोल चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली. "शिक्षक सुरेश बोरसे यांच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या प्रत्येक आरोपीवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. कायद्याचे रक्षण करणारेच जर कायदा हातात घेत असतील, तर राज्यातील नागरिकांनी न्याय कोणाकडे मागायचा? या प्रकरणातील दोषींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घालण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. सत्य बाहेर आले पाहिजे आणि दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे," अशी भूमिका आमदार अंबादास दानवे यांनी मांडली.**

## मार्मिक टोमणे



# सं पा द की य

## सुनेत्रा पवारांचे नेतृत्व - राष्ट्रवादीची नवी दिशा

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सत्ताविसाव्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून मुंबईत पार पडलेला सोहळा पक्षाच्या बदलत्या राजकीय प्रवासाची आणि नव्या नेतृत्वाची दिशा स्पष्ट करणारा ठरला. दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनानंतर साजरा होणारा हा पहिलाच वर्धापनदिन असल्याने संपूर्ण कार्यक्रमात भावुक आणि तितकेच आक्रमक वातावरण पाहायला मिळाले. पक्षाच्या नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत पक्षाची धुरा हाती घेतली आहे. आपल्या पहिल्याच मोठ्या भाषणात त्यांनी दिलेला इशारा हा केवळ कार्यकर्त्यांना धीर देणारा नसून, विरोधक आणि अंतर्गत विरोधकांनाही त्यांची जागा दाखवून देणारा ठरला. पक्षाच्या हितासाठी कठोर निर्णय घेण्यास मागेपुढे पाहणार नाही, हा त्यांचा पवित्रा आगामी काळातील त्यांच्या कणखर नेतृत्वाची चुणूक दाखवणारा आहे. या वर्धापनदिन सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे पक्षातील ज्येष्ठ नेत्यांमध्ये रंगलेली शाब्दिक जुगलबंदी आणि राजकीय इतिहासाला मिळालेली उजाळा. मंत्री छगन भुजबळ यांनी नेहमीप्रमाणे आपल्या खास शैलीत राजकीय टोलेबाजी करत सत्ता हे शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचे साधन असल्याचे सांगत राजकारणाचा खेळ न करण्याचा सल्ला दिला. भुजबळ, सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्यातील खेळाच्या उपमांवरून रंगलेली जुगलबंदी कार्यकर्त्यांचे मनोरंजन करणारी ठरली असली, तरी त्यामागे पक्षाची मजबूत फळी उभी करण्याचा हेतू स्पष्ट दिसत होता. ८० वर्षांचा हा तरुण आता वहिनींचे म्हणजेच सुनेत्रा पवारांचे हात बळकट करण्यासाठी मैदानात उतरला आहे, हे तटकरे यांचे विधान पक्षातील एकी दर्शवण्यासाठी पुरेसे आहे. दुसरीकडे, विरोधकांकडून सातत्याने होणाऱ्या 'गद्दारी'च्या टीकेला चोख उत्तर देत सुनील तटकरे यांनी २०१९ मधील भाजपसोबतच्या सत्तास्थापनेच्या पडद्याआड घडलेल्या घडामोडींवरून थेट शरद पवार आणि रोहित पवार यांच्यावर निशाणा साधला. भाजपसोबत जाण्याच्या पत्रावर पहिली सही कुणाची होती, हा त्यांनी उपस्थित केलेला प्रश्न आगामी काळात नव्या राजकीय वादाला तोंड फोडणारा ठरू शकतो. इतिहास शोधून काढण्याचे आव्हान देत त्यांनी पक्षाच्या जुन्या भूमिकेचे समर्थन केले. तसेच २००४ मध्ये मुख्यमंत्रिपद सोडण्याच्या चुकीमुळे पक्षाचे जे नुकसान झाले, त्याची कसर आता भरून काढण्याची वेळ आली आहे, हा संदेशही यातून देण्यात आला. कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांनी पक्षाच्या भविष्यकालीन विस्ताराचा जो आराखडा मांडला, तो अत्यंत व्यावहारिक आणि अभ्यासपूर्ण आहे. आगामी काळातील मतदारसंघांची पुनर्रचना आणि महिला आरक्षण विधेयकाचे संकेत देत त्यांनी पक्षाला आता केवळ 'शेतकऱ्यांचा किंवा ग्रामीण भागाचा पक्ष' या प्रतिमेतून बाहेर काढण्याचे आवाहन केले. मुंबई, पुणे, नागपूर आणि ठाणे यांसारख्या वेगाने वाढणाऱ्या शहरी भागांत लक्ष केंद्रित केल्याशिवाय पक्षाला मोठे यश मिळणार नाही, हे वास्तव त्यांनी मांडले. प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा 'ऑक्सिजन' आहे, या सुनेत्रा पवारांच्या विधानाला बळकटी देत, बूथ पातळीपासून ते शहरी भागापर्यंत पक्षाची मजबूत फळी निर्माण करणे हेच आता या नव्या नेतृत्वापुढील मुख्य आव्हान असणार आहे.

## आणि दिव्यांग मोहिनीला मिळाला 15 वर्षानंतर "आधार" जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासनाची कार्यतत्परता




**छत्रपती संभाजीनगर | दि. ११ :** गेली अनेक वर्ष आवश्यक असलेल्या कागद पत्रांसाठी धावा-धाव करूनही हाती निराशा आल्याने हतबल झालेले आई-वडील गुरुवारी (दि. ११) थेट जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचले आणि जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्याकडे आपली कैफियत मांडली. संपूर्ण दिव्यांग असलेली मोहिनी हिची अवस्था आणि तिच्या आई वडिलांची परिस्थिति पाहून जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी तातडीने आदेश करत संपूर्ण प्रशासनाला कामाला लावले. याबाबतचे गांभीर्य ओळखत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), दिव्यांग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुरेश माने यांनी प्रशासनाशी संपर्क साधत अवघ्या काही तासांतच मोहिनीला "आधार" कार्ड मिळवून दिले. १५ वर्षानंतर आधार कार्ड मिळाल्याने मोहिनी व तिच्या आई वडिलांच्या चेहऱ्यावर प्रचंड आनंद यावेळी दिसून आल्याने छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनाची कार्यतत्परता आणि दिव्यांग आघाडीचे सुरेश माने यांची समयसूचकता यावेळी दिसून आली.

पैठण तालुक्यात असलेल्या अंतरवाली खांडी या गावात हरिभाऊ डीघूळे आणि ध्रुपताबाई डीघूळे हे आपल्या तीन मुले आणि एक मुलगी मोहिनी यांच्यासोबत राहतात. मोलमजुरी करून आपला उदारनिर्वाह करणाऱ्या हे कुटुंब संपूर्ण दिव्यांग असलेल्या वीस वर्षीय मोहिनीचे जबाबदारीने संगोपन करतात. तसेच वेळोवेळी तिचे जेवण, औषधी, आरोग्य तपासणी आणि दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी तारेवरची कसरतही करतात. मोहिनी ही संपूर्ण दिव्यांग असल्याने तिचे आधार नोंद करण्यासाठी अनेक अडचणी येत होत्या. गेली अनेक वर्षे ग्रामीण आणि शहरी आई - वडिलांना शहरी व ग्रामीण भागातील शासकीय कार्यालयात मोहिनीच्या दिव्यांग प्रमाणपत्रासाठी मूळ कागद पत्रे जमा करण्यासाठी खस्ता खात आपल्या चपला झिजवाव्या लागल्या. शासकीय नियमानुसार आधार नोंदणी साठी हातांच्या बोटांचे ठसे, डोळ्यांचे स्कॅन, तसेच इतर बाबी आवश्यक असल्याने मोहिनीच्या दिव्यांग अवस्थेमुळे त्या शक्य होत नव्हत्या. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि अनुभवी अधिकाऱ्यांनी चार ते पाच तास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वारातच प्रयत्नांची पराकाष्टा केली. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या अनेक अभ्यागतांचे मन मोहिनीच्या दिव्यांग अवस्थेने हेलावून गेले.

मात्र या परिस्थितीची छत्रपती संभाजी नगर जिल्हाधिकारी प्रशासन आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), दिव्यांग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुरेश माने हे पुणे दौऱ्यावर असताना सुद्धा त्यांचे सहकारी मित्र जय वऱ्हाडे पाटील यांनी त्यांच्याशी संपर्क केला. आणि माने यांनी गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी प्रशासकीय अधिकाऱ्यांना मोहिनी ला मदत करण्यासाठी विनंती केली. यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागाचे जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक शरद दिवेकर, वैद्यकीय कक्षाचे आरोग्य अधिकारी डॉ. महेश लड्डा आणि तातडीने सूत्रे हलवत मोहिनी ला "आधार" कार्ड नोंदणी करण्यासाठी पुढाकार घेतला.


# आखाती समस्या आणि आपण...!

आखातामधील युद्ध सुरु झाल्यानंतर आपणासमोर इंधन संकट उभं राहिलं. देशांत आपण ऊर्जेचा वापर करतो त्यात सर्वाधिक वापर हा पेट्रोलियम उत्पादनांचा आहे आणि याबाबतीत आपण स्वयंपूर्ण नाहीत. आपल्या देशाची आधिकाधिक विदेशी मुद्रा इंधन खरेदीसाठी वापरली जात आहे. या पार्श्वभूमीवर इंधन वाचवण्याचा सल्ला देत आपण काही प्रमाणात या खर्चात बचत केली असली तरी या सर्वांचा एकत्रित परिणाम आपणास महागाईच्या रुपाने सहन करावा लागत आहे.

केवळ पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी याचाच विचार न करता आगामी काळात एकूणच ऊर्जावापर धोरण देशपातळीवरच नव्हे तर आपणास आपला घराच्या पातळीपर्यंत करण्याची वेळ आज आली आहे.

घरात गॅसच्या वापरासोबत आपण विजेचा वापर करतो या विजेच्या निर्मितीमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर आपण आजही जिवाश्म (कोळसा इंधनावर) अवलंबून आहे. येणाऱ्या काळात सूपर एल निनोचे संकट आपल्या समोर आहे. हे संकट जीवनाच्या सर्वच बाजूंनी आपली परिक्षा घेणारे ठरणार आहे.

सूपर एल निनोमुळे पृथ्वीच्या तापमानात २ अंश सेल्सीअसची वाढ होईल असा अंदाज आहे. यामुळे आपला मौसमी पावसाच्या देशात पावसाचे प्रमाण




कमी राहणार हे स्पष्ट झाले आहे. याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादनावर होणार आहे.

तापमान आणि सिमेटची जंगलं

सध्या हवामान मोजताना आपण वेधशाळेचे आकडे बघतो ते ४३-४४ अंश आणि त्याच्या आसपास आहेत. प्रत्यक्षात संरक्षित जागेत मोजलेले हे तापमान हवामान काय सांगत आहे याचा एक पुरावा असतो.

मोठ्या प्रमाणावर झालेल्या शहरीकरणामुळे ऊंच सिमेंटच्या इमारतीचं जंगल आणि त्यात सिमेंट किंवा डांबरी रस्ते अशा वातावरणात दृश्य तापमान ४५ अंश असले तरी पृष्ठभागीय (Surface Temperature) तापमान ५० अंशांपर्यंत वाढलेले असल्याने शहरी भागात उन्हाळा अधिक जाणवतो आणि हे सर्व पृष्ठभाग थंड लवकर होत नाहीत. त्यामुळे रात्रीच्या तापमानात देखील आपणास उष्णता जाणवत राहते

उष्णतेपासून बचाव अर्थात पंखे, कुलर आणि ए.सी. यांचा वाढलेला वापर ज्याचा ताण मग वीज निर्मितीवर होतो आणि मग अनेक भागात लोडशेडींग आणि उष्णता असा दुहेरी त्रास जाणवत असतो

आपल्याकडे उन्हाळ्यात विजेची मागणी आणि पुरवठा यामध्ये गेल्या २ वर्षात तफावत वाढताना दिसत आहे. वीज निर्मिती केंद्रांवरील ताण वाढत आहे. याला पर्यायी ऊर्जा माधन मृणजे सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि जलविद्युत त्यात देश वेगाने वाटचाल करीत आहे. तथापि मागणी सातत्याने वाढत राहिल्यामुळे ही स्थिती कायमच आहे. एल-निनोच्या काळात हे संकट अधिक गहिरे होणार आहे. आखाती युद्ध एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला सूपर एल-निनो चे घोंघावणारे संकट या पार्श्वभूमीवर शासन उपाय योजना करीतच आहे परंतु आपण देखील आपली जबाबदारी ओळखून यात योगदान देणे आवश्यक आहे

सार्वजनिक वाहन प्रणालीचा वापर वाढवण्याची गरज निर्माण झाली आहे. कोरोना संकटानंतर प्रत्येकाने सुरक्षा म्हणून स्वतःचे वाहन वापरणे सुरु केले यामुळे इंधन संकटासोबत पर्यावरण प्रदूषण, कार्बन उत्सर्जन, ध्वनी प्रदूषण आणि रस्ते अपघात असे नवे दुष्टचक्र आता समोर येत आहे

सौर ऊर्जेच्या वापरातून आपण स्वतःच्या गरजेपुरती ऊर्जा किंवा त्यातील निम्मा वाटा प्रधानमंत्री सूर्यघर सारख्या योजनांमधून उचलू शकतो. पेट्रोलियम खर्चात कपात करण्यासाठी आता इलेक्ट्रीक आणि सीएनजी वर चालणारी वाहने बाजारात आली आहेत आणि त्याला चांगला प्रतिसाद दिसत आहे. असे असले तरी आगामी काळात याला अधिक गती देण्याची गरज आहे

देशातील अग्रगण्य कंपनीने नुकतीच E-८५ वाहन मालिका सादर केली आहे. आपण सध्या E-२० इंधन अर्थात २० टक्के इथेनॉल मिश्रीत पेट्रोत वापरत आहोत. E-८५ आगामी काळात वापरायची तयारी करावी लागणार आहे. या E-८५ मुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे आणि आगामी काळ E-३०, E-५० व E-८५ वाहनांचा होईल हे नकी यातून पर्यावरण रक्षणाला देखील हातभार लागणार आहे.

आपला या आसेतू हिमाचल देशात विविध प्रांतात विविध भौगोलिक रचना आणि आव्हाने आहेत. त्यात अडकून न पडता आपण या क्षमतेच्या निराकरणात अल्पसा वाटा उचलला तरी येणाऱ्या संकटाचे गांभीर्य कमी करता येईल. याबाबत प्रत्येकाने जरूर विचार करावा.

**प्रशांत दैठणकर**
**९८२३१९९४६६**

# समाजात पदांची निर्मिती शोभेची वस्तू नसून विकासासाठी आणि प्रबोधनासाठी असतात!

संविधान निर्मात्यांनी ओबीसींसाठी संविधानात तरतूद केलेली आहे त्याचा योग्य उपयोग समाजात नेतेगिरी करणाऱ्या ओबीसी सुतार समाज नेत्यांनी समाज जागृतीसाठी करावा.आदर्श ओबीसी सुतार समाजात राज्यस्तरीय नामकरणाचा मुकुट परिधान करणाऱ्या अनेक सामाजिक संघटना,संस्था,विविध विकास मंच अनेक विविध प्रतिष्ठान असतील आणि संपूर्ण राज्यभरात हजारो पदाधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली असेल यापैकी अनेक जण स्वतःलाच समाजाचे दिग्गज नेतृत्व आणि धडाकेबाज युवक नेतृत्व म्हणवून घेत असतील परंतु,कोणाच्याही नेतृत्वाखाली स्वतःच्या हक्काच्या गृह जिल्ह्यात हजारोंच्या संख्येने उद्योग व्यवसाय उभारणी करून तळागाळातील आणि सुशिक्षित बेरोजगार युवकांना तसेच गरजू महिलांना आर्थिक उत्पनाचे साधन संसाधन म्हणून रोजगार निर्मिती केलेली नाही.ओबीसी,आरक्षण,जनगणना,संवैधानिक अधिकार,सत्ता,संपत्ती,ज्ञान आणि राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज जागृती मेळाव्यात हजारोंच्या संख्येने समाजाला एकत्रित केलेले नाही.

ओबीसी सुतार समाजात मोठ्या आवेशात नेतेगिरी करणाऱ्या स्वयंघोषित नेत्यांनी आणि जबाबदार पदाधिकाऱ्यांनी समाजात उद्योग व्यवसाय,ओबीसी,आणि राजकीय हिस्सेदारी संदर्भात सुतार समाजात समाज जागृती निर्माण करण्यासाठी अजिबात प्रयत्न केले नाहीत कारण समाज जागृत झाला तर या लोकांना उजळमाथ्याने मोठेपणा मात्र मिरवता येणार त्यासाठी बुद्धिवान लोकांनी जागरूक असावे जेणेकरून ओबीसी सुतार समाजाची दिशाभूल करण्यास कोणताही पुढारी धजावणार नाहीत.समाजात फक्त विशिष्ट लोकांचे वाढदिवस,सदिच्छा भेटीगाठीचे,आनंदाच्या क्षणांचे औचित्य साधून मात्र सोशल मीडियावर फोटोबाजी करून त्याखाली न विसरता ठळकपणे आवर्जून संबंधित पदांचा उल्लेख केला जातो अशाच पद्धतीने समाजात स्वयंघोषित पुढारी उदयास येतात हिच सत्य परिस्थिती आहे.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात अनेक वर्षांपासून मोठ्या रुबाबात नेतेगिरी करणाऱ्या कोणत्याही स्वयंघोषित दिग्गज नेत्यांनी आणि कोणत्याही स्वयंघोषित धडाकेबाज युवक नेत्यांनी आपापल्या खऱ्या खोट्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करून ओबीसी,आरक्षण,जनगणना,संविधान,सत्ता,संपत्ती,ज्ञान आणि राजकीय हिस्सेदारी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित केलेले नाहीत या व्यतिरिक्त कोणत्याही स्वयंघोषित समाज नेत्यांनी सुतार समाजात लाखोंच्या संख्येने उद्योग व्यवसाय उभारणी केलेली नाही शिवाय समाजाला संवैधानिक आधार आणि संवैधानिक अधिकार असलेले राजकीय प्रतिनिधित्व मिळवून दिले नाही.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील जबाबदार पदाधिकारी आणि सर्वच स्वयंघोषित नेत्यांनी समाज चिंतन करण्याची नितांत गरज आहे.सुतार समाजात फक्त नावासोबत सामाजिक पदभार जोडण्यासाठी नसतो हे आपण सर्वच मान्यवर जाणतो.सामाजिक क्षेत्रातील प्रतिष्ठित समजणारे सामाजिक पद आणि पदानुसार समाज प्रतिष्ठा,पदाच्या उंचीनुसार हक्काचे ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करण्याची समाजात क्षमता,पात्रता,प्रतिष्ठा ओबीसी सुतार समाजात समाज किंमत,प्रभाव,प्राबल्य,प्रभुत्व,समाजात प्रचंड समाजप्रिय असलेले,समाज अभ्यासक,थोर विचारवंत आणि कृतीशील,कार्यसम्राट,सुतार सम्राट,कर्तबगार,कर्तृत्ववान सामाजिक कार्यात तत्परता इत्यादी तर ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात सामाजिक वैचारिक तसेच नैतिकतेच्या आधारावर ओबीसी सुतार समाजात एकही बहाद्दर सामाजिक ते राजकीय पदाधिकारी सापडणार नाही हि ओबीसी सुतार समाजात सत्य परिस्थिती आहे.

ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रातील सर्वच सन्माननीय जबाबदार पदाधिकारी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली मग ते सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील पद तालुका पातळीवर असो अथवा जिल्हा पातळीवर असो किंवा,राज्य पातळीवर असो असावे फक्त नावासोबत पदभार,पदावली,एखाद्या पदाची नैतिक जबाबदारी स्वीकारलेली असेल अशा सर्वच बुद्धिवान,कर्तृत्ववान प्रत्येक जबाबदार सन्माननीय पदाधिकारी मान्यवरांच्या नेतृत्वाखाली त्या त्या क्षेत्रातील त्या त्या भौगोलिक क्षेत्रातील ओबीसी सुतार समाज बांधवांना दरडोई किमान दहा ते पंधरा हजार तरी ओबीसी सुतार समाज बांधवांना ओबीसी संदर्भात समाज जागृती मेळाव्यात,आरक्षण,संविधान जागरूकता अभियान कार्यक्रमात,ओबीसी समाज आंदोलनात,ओबीसी मोर्चात किंवा,इतर अन्य ओबीसी संदर्भात सुतार समाज प्रबोधनात्मक,समाज आंदोलनात्मक कार्यक्रमात संबंधित नेतृत्वाखाली दरडोई किमान दहा ते पंधरा हजार ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करावं यासाठी मोठं धाडस करावं.विश्वकर्मीय सुतार समाजात एवढा मोठा प्रचंड समाज ताफा,संपूर्ण राज्यातील जबाबदार आणि कृतिशील लाखोंच्या संख्येने कार्यकर्ते आणि हजारोंच्या संख्येने पदाधिकाऱ्यांची प्रचंड शक्ती,पाठबळ सामाजिक संघटनांकडे कार्यरत असतांना ओबीसी संदर्भात समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमात पिछाडीवर कशासाठी हा प्रश्न मात्र समाजात अनुत्तरित आहे.ओबीसी सुतार समाज सुशिक्षित,उच्चशिक्षित,बुद्धिवान आहे याची कल्पना सर्वांनाच आहे.शिवाय अनेक समाज मान्यवर समाजात समाज प्रतिष्ठित,प्रतिभावंत,प्रभावशाली असतील.समाजात अनेक मान्यवरांनी स्वतःच्या नावासोबत समाज नेता,समाज नेतृत्व आणि युवक नेतृत्व अशी सन्मानित पदाची बिरुदावली सुद्धा जोडण्यात आलेली असेलच.याव्यतिरिक्त समाजात सुतार समाजाची शान,बाण,आण आणि दिग्गज,धुरंधर,बुलुंद तोफ,बुलुंद आवाज तसेच कार्यसम्राट,कर्तबगार,कर्तृत्ववान, तडफदार,धडाकेबाज,विचारवंत,मार्गदर्शक,आधारस्तंभ असणारे सुद्धा ओबीसी सुतार समाजात नक्कीच असतील.

विश्वकर्मीय राज्यस्तरीय ओबीसी सुतार समाजात समाज प्रभाव,प्रभूत्व,प्राबल्य,समाजात समाजप्रिय सुद्धा असतील समाजात वैयक्तिक पातळीवर कोण किती आर्थिक परिस्थितीने गर्भश्रीमंत,धनवान,धनाढ्य, प्रतिष्ठित,प्रतिभावंत आहेत याचा संबंध अजिबात येत नाही.समाजात सामाजिक श्रीमंती आणि वैयक्तिक श्रीमंती हे दोन्हीही विषय वेगवेगळे आहेत हे लक्षात घेणे गरजेचे असते.ओबीसी सुतार सामाजिक क्षेत्रात मोठ्या रुबाबात आणि मोठ्या दिमाखात समाज नेतेगिरी करणाऱ्या समाज नेत्यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना ओबीसी समाज प्रबोधनात्मक कार्यक्रमात,समाज जागृती मेळाव्यात,आंदोलन ठिकाणी,ओबीसी मोर्चात समाजात सहभागी करणे गरजेचेच आहे.

विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात पदांची निर्मिती करणे म्हणजे संबंधित पदाची कर्तव्याची आणि जबाबदारीची जाणिव करून देणारे एक महत्वाचे माध्यम असते.पदांची निर्मिती म्हणजे मान्यताप्राप्त,कर्तबगार, कर्तृत्ववान,कार्यसम्राट नेतृत्व होत नाही.समाजात नेतेगिरी करणारे आणि संघटना अध्यक्ष मान्यवरांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण राज्यात ओबीसी संदर्भात समाज जागृती मेळाव्याचे आयोजन करून लाखोंच्या संख्येने ओबीसी सुतार समाज बांधवांना एकत्रित करणार आहात काय?

समाजात लाखोंच्या संख्येने उद्योग व्यवसाय उभारणी करण्यात येईल काय आणि समाजाला संवैधानिक आधार व अधिकार असलेले राजकीय प्रतिनिधित्व सुध्दा मिळवून देणार आहात काय?

समाजाला सत्य,वास्तव परिस्थिती समजण्यासाठी पारदर्शकपणे आपापल्या संघटनेच्याच वतीने जाहीर करावी.ओबीसी सुतार समाजात असे किती समाज मान्यवर खऱ्या समाज कसोटीवर उतरतील.सामाजिक,वैचारिक,नैतिक जबाबदारीचा विचार करता हे शिवधनुष्य पेलणे जमत नसेल तर मग म्हणावेसे वाटते कि,विश्वकर्मीय ओबीसी सुतार समाजात विविध पदांची निर्मिती शोभेची वस्तू नसून विकासासाठी आणि प्रबोधनासाठी असतात.लिखाण समाज जागृती अभियान अंतर्गत.

**प्रमोद सूर्यवंशी :-८६०५५६९५२१.**
**चिखली,मातृतीर्थ बुलडाणा**

# आकाशातील संदेशवाहक : कोकणातील पावसाळी पक्षी आणि निसर्गाची चिरंतन भाषा

"पृथ्वीवर पडणाऱ्या प्रत्येक पावसाच्या थेंबामागे एक कथा असते, आणि त्या कथेची पहिली बातमी अनेकदा पक्षीच घेऊन येतात. त्यांच्या किलबिलाटात ऋतूंची चाहूल असते, त्यांच्या उड्डाणात काळाचा प्रवास असतो आणि त्यांच्या अस्तित्वात निसर्गाच्या शाश्वत ज्ञानाचा खजिना दडलेला असतो."

कोकण म्हणजे पाऊस, हिरवाई, समुद्र आणि जीवनाचा अखंड उत्सव. सह्याद्रीच्या कुशीत विसावलेल्या या भूमीत निसर्ग केवळ दिसत नाही, तर तो प्रत्येक क्षणी अनुभवता येतो. येथे पावसाळ्याचे आगमन हे फक्त हवामानातील बदल नसते; ते संपूर्ण सृष्टीच्या नवजीवनाचे पर्व असते. या पर्वाची सर्वात सुंदर आणि विश्वासार्ह चाहूल देणारे जीव म्हणजे पक्षी.

मानवाने विज्ञानाच्या बळावर आकाशाचा वेध घेतला, उपग्रह अवकाशात पाठवले आणि हवामानाचा अंदाज बांधण्याची अत्याधुनिक साधने निर्माण केली. तरीही निसर्गाच्या सूक्ष्म संकेतांचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. कोकणातील अनेक अनुभवी शेतकरी पक्ष्यांच्या हालचाली, त्यांच्या आवाजातील बदल आणि घरटी बांधण्याच्या पद्धती यांचे निरीक्षण करून पावसाच्या आगमनाची कल्पना करतात. ही केवळ परंपरा नाही; ती अनुभव, निरीक्षण आणि निसर्गाशी असलेल्या गाढ नात्याची अमूल्य देणगी आहे.

पावसाळ्यापूर्वी काही पक्षी विशेष सक्रिय होतात. त्यांच्या वर्तनातील बदल हे आगामी ऋतूचे संकेत मानले जातात. काही पक्षी अधिक किलबिल करू लागतात, काही उंच झाडांवर घरटी बांधतात, तर काही सुरक्षित जागांचा शोध घेतात. त्यांच्या या हालचाली जणू निसर्गाच्या अदृश्य लेखणीने लिहिलेली भविष्यवाणीच असते.

विशेषतः विणकर पक्षी हा निसर्गातील परिश्रम, कौशल्य आणि नियोजन यांचा अद्भुत नमुना आहे. गवताच्या नाजूक तंतूंनी तो तयार करत असलेली घरटी पाहताना मानवी कलाकौशल्यालाही लाजवेल असे सौंदर्य दिसते. वारा, पाऊस आणि सुरक्षितता यांचा विचार करून तो घरट्याची रचना करतो. त्याच्या प्रत्येक विणीत संयम आहे, प्रत्येक तंतूत कष्ट आहेत आणि प्रत्येक घरट्यात जीवनाविषयीचा विश्वास दडलेला आहे.

पक्षी हे केवळ पावसाचे दूत नाहीत; ते शेतकऱ्यांचे निःशब्द सहकारी देखील आहेत. अनेक पक्षी शेतीतील हानिकारक कीटकांवर उपजीविका करतात. त्यामुळे पिकांचे संरक्षण नैसर्गिकरीत्या होते. ज्या शेतात पक्ष्यांचा वावर अधिक असतो, तेथील परिसंस्था अधिक संतुलित राहते. म्हणूनच पक्ष्यांचे अस्तित्व शेतीच्या समृद्धीशी थेट जोडलेले आहे.

पक्ष्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते पर्यावरणाच्या आरोग्याचे जिवंत निर्देशक असतात. एखाद्या प्रदेशातील पक्ष्यांची संख्या कमी होणे, त्यांच्या स्थलांतराच्या पद्धती बदलणे किंवा त्यांचे अधिवास नष्ट होणे हे पर्यावरणीय असंतुलनाचे गंभीर संकेत असतात. त्यामुळे पक्ष्यांचे निरीक्षण हे केवळ निसर्गप्रेमाचे लक्षण नसून पर्यावरण संरक्षणाचे महत्त्वाचे साधन आहे.

आज मात्र पक्ष्यांसमोर अनेक संकटे उभी आहेत. जंगलतोड, वाढते शहरीकरण, प्रदूषण, जलस्रोतांचा ऱ्हास आणि हवामान बदल यांमुळे अनेक प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. झाडे कमी होत असल्याने त्यांना घरटी बांधण्यासाठी योग्य जागा मिळत नाही. रासायनिक कीटकनाशकांमुळे त्यांच्या अन्नसाखळीवर परिणाम होतो. ही परिस्थिती केवळ पक्ष्यांसाठीच नव्हे तर संपूर्ण पर्यावरणासाठी चिंताजनक आहे.

पक्ष्यांचे संरक्षण करणे ही केवळ पर्यावरणवादी भूमिका नाही; ती मानवजातीची नैतिक जबाबदारी आहे. झाडे लावणे, स्थानिक वनस्पतींचे संवर्धन करणे, जलस्रोत स्वच्छ ठेवणे आणि पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे अशा छोट्या कृतींमधून आपण मोठा बदल घडवू शकतो. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था यांनी पक्षीनिरीक्षण व पर्यावरण जागृतीचे कार्यक्रम राबविल्यास नव्या पिढीमध्ये निसर्गाविषयी प्रेम आणि जबाबदारीची भावना निर्माण होईल.

खरे तर पक्षी आपल्याला जीवनाचे गहन तत्त्वज्ञान शिकवतात. ते आपल्याला सांगतात की स्वातंत्र्य म्हणजे केवळ बंधनांचा अभाव नव्हे, तर उंच भरारी घेण्याचे धैर्य आहे. ते शिकवतात की संकटे आली तरी पुन्हा घरटे बांधावे, अपयश आले तरी पुन्हा उडावे आणि अंधार दाटला तरी पहाटेवर विश्वास ठेवावा.

कोकणातील पावसाळी पक्षी हे केवळ निसर्गाचा भाग नाहीत; ते पृथ्वीच्या आत्म्याचे स्वर आहेत. त्यांच्या किलबिलाटात आशेची गाणी आहेत, त्यांच्या पंखांत भविष्याची स्वप्ने आहेत आणि त्यांच्या अस्तित्वात निसर्गाच्या चिरंतन सौंदर्याचे दर्शन आहे. ज्या दिवशी आपण पक्ष्यांचे महत्त्व पूर्णपणे समजून घेऊ, त्या दिवशी आपण निसर्गाचे महत्त्वही समजून घेऊ.

कारण पक्षी हे फक्त आकाशात उडणारे जीव नसतात; ते पृथ्वी आणि आकाश यांना जोडणारे जिवंत पूल असतात. आणि जोपर्यंत त्यांच्या स्वरांनी आकाश दुमदुमत राहील, तोपर्यंत मानवाच्या आशाही जिवंत राहतील.

**लेखक :** पांडुरंग मारुती धुमाळ

# कोट्यवधींच्या ठेवींवर ऑडिटची नजर

**पान 1 वरून ->**

जाते. रोख शिल्लक, ठेवी, कर्जवाटप, थकबाकी, एनपीएचे प्रमाण, गुंतवणूक, तरलता आणि आर्थिक तरतुदी यांची सखोल पडताळणी करण्यात येते. कोणताही लेखापरीक्षक सलग तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एकाच संस्थेचे ऑडिट करू शकत नसल्याने लेखापरीक्षण प्रक्रियेत निष्पक्षता राखली जाते.

सहकार विभागाच्या नियमांनुसार लेखापरीक्षण पूर्ण झाल्यानंतर निर्धारित कालावधीत अहवाल सादर करणे आवश्यक असते. ऑडिटच्या आधारे संस्थांना 'अ', 'ब', 'क' किंवा 'ड' असे वर्गांकन दिले जाते. या वर्गांकनावर संस्थेची आर्थिक विश्वासार्हता आणि व्यवस्थापनाची गुणवत्ता अवलंबून असते.

ऑडिटमध्ये आढळलेल्या त्रुटींची दोषदुरुस्ती करणेही संस्थांसाठी बंधनकारक असते. निर्धारित मुदतीत दोषदुरुस्ती अहवाल सादर न केल्यास सहकार विभागाकडून कारणे दाखवा नोटीस, दंडात्मक कारवाई किंवा इतर प्रशासकीय उपाययोजना करण्यात येऊ शकतात. गंभीर आर्थिक अनियमितता आढळल्यास संचालक मंडळावर कारवाई, विशेष चौकशी अथवा प्रशासक नियुक्त करण्याची तरतूदही कायद्यात आहे.

सहकार क्षेत्रातील जाणकारांच्या मते, ग्रामीण भागात बँकिंग सेवा मर्यादित असताना पतसंस्थांनी आर्थिक समावेशनात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मात्र वाढत्या स्पर्धेच्या काळात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सभासदांचा विश्वास टिकवून ठेवणे हेच या संस्थांसमोरील सर्वात मोठे आव्हान ठरत आहे.

सहकार क्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, ठेवीदारांनीही केवळ जास्त व्याजदराच्या आमिषाला बळी न पडता संबंधित संस्थेचा ऑडिट वर्ग, आर्थिक स्थिती आणि व्यवस्थापनाची विश्वासार्हता तपासूनच गुंतवणूक करावी. कारण मजबूत आणि पारदर्शक पतसंस्थाच सहकार चळवळीला दीर्घकाळ टिकवून ठेवू शकतात.

## 15 वर्षांचं प्रेम अवघ्या 7 दिवसांत संपले

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात डोळ्यात टचकन पाणी येईल अशी धक्कादायक घटना समोर आली आहे.लग्नानंतर अवघ्या सात दिवसांतच एका नवविवाहितेचा अचानक चक्कर येऊन पडल्याने दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटने नंतर नववधू आणि मुलीकडच्या माहेरची मंडळी आणि मित्रपरिवार यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# जनसंपर्क दौऱ्याने रंगले राजकीय वातावरण; मतदारांशी थेट संवाद



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर-जालना स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणूक - 2026 चे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार गणेश लोखंडे यांच्या प्रचारार्थ शिवसेना नेते तथा राज्याचे माजी विधान परिषद विरोधी पक्षनेते, आमदार अंबादास दानवे यांनी 11 जून रोजी जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये मतदारांच्या भेटीगाठी घेतल्या. गंगापूर, वैजापूर, कन्नड व रत्नपूर तालुक्यातील नगर पंचायत सदस्य, जिल्हा परिषद सदस्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांतील मतदारांशी संवाद साधत दानवे यांनी गणेश लोखंडे यांना प्रथम पसंतीचे मतदान करण्याचे आवाहन केले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांची सखोल जाण, विकासाची स्पष्ट दृष्टी आणि सर्वसमावेशक नेतृत्व असलेले गणेश लोखंडे हे महाविकास आघाडीचे सक्षम उमेदवार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या विधान परिषदेत प्रभावीपणे मांडण्यासाठी आणि विकासाला गती देण्यासाठी लोखंडे यांना विजयी करण्याचे आवाहन दानवे यांनी मतदारांना केले. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख अविनाश पाटील, अंकुश सुब, तालुकाप्रमुख सुभाष कानडे, मनाजी पाटील मिसाळ, संजय मोटे, राजू वरकड, तालुका संघटक मनोज गायके, विधानसभाप्रमुख प्रमोद ठेंगडे, मुकेश मालोदे, विठ्ठल डमाळे आणि अक्षय साठे यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्राच्या आरोग्य सेवांना केंद्राची साथ; कॉक्लियर इम्प्लांटची वयोमर्यादा 5 वर्षांपर्यंत वाढणार

## आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांची नवी दिल्लीत उच्चस्तरीय बैठक

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी नवी दिल्ली येथे राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या (NHM) केंद्रीय अतिरिक्त सचिव तथा व्यवस्थापकीय संचालक आराधना पटनाईक (IAS) यांची कर्तव्य भवन येथे भेट घेतली. सन २०२६-२७ च्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखड्यांतर्गत (PIP) निधी मंजुरी तसेच अतिरिक्त निधीच्या मागण्यांवर यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीतील सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (RBSK) अंतर्गत कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रियेसाठी पात्र लाभार्थी बालकांची वयोमर्यादा दोन वर्षांवरून पाच वर्षांपर्यंत वाढविण्यास तत्त्वतः मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे श्रवणदोष असलेल्या अधिकाधिक बालकांना उपचाराचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यात आशा स्वयंसेविकांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या दैनंदिन कामकाजातील ऑनलाइन नोंदी, अहवाल सादरीकरण आणि डिजिटल आरोग्य व्यवस्थापन अधिक सुलभ करण्यासाठी त्यांना मोबाईल फोन उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावालाही केंद्र शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. तसेच आशा स्वयंसेविकांचे प्रोत्साहनपर मानधन वेळेत वितरित होण्यासाठी आवश्यक निधी नियमितपणे उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली.

याशिवाय जननी सुरक्षा योजना (JSY), कुटुंब नियोजन कार्यक्रम तसेच क्षयरोग निर्मूलनासाठी राबविण्यात येणाऱ्या निक्षय (Nikshay) योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण (DBT) वेळेत मिळावे यासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने सादर केलेल्या विविध नाविन्यपूर्ण आरोग्यविषयक प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबतही चर्चा झाली.

# नशामुक्त भारत अभियानासाठी डॉ. कृष्णा भावले यांची जिल्हास्तरीय मास्टर ट्रेनर म्हणून नियुक्ती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर :** नशामुक्त भारत अभियानांतर्गत आयोजित जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमात सातपुडा आदिवासी नशामुक्ती केंद्र, धवलीचे अध्यक्ष डॉ. कृष्णा बबिता रामचंद्र भावले यांची जिल्हास्तरीय मास्टर ट्रेनर म्हणून नियुक्ती करण्यात आली. सामाजिक न्याय व दिव्यांग सक्षमीकरण विभाग, मध्य प्रदेश शासन, जल एवं भूमी प्रबंधन संस्था, भोपाल आणि जिल्हा प्रशासन बडवानी यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी त्यांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

प्रशिक्षण कार्यक्रमात जिल्ह्यातील १२० मास्टर ट्रेनर्स व स्वयंसेवकांना व्यसनमुक्ती, व्यसन प्रतिबंध, जनजागृती आणि वैद्यकीय पैलूंविषयी मार्गदर्शन करण्यात आले. राज्यस्तरीय प्रशिक्षक रजत नागदार यांचेही यावेळी मार्गदर्शन लाभले. सातपुडा आदिवासी नशामुक्ती केंद्रातील खुमसिंग चौहान, डॉ. ग्यारसीलाल भुगावडे, रतन चौहान व रमेश चौहान यांच्यासह पाच सदस्यांनी प्रशिक्षणात सहभाग घेतला.

डॉ. भावले हे गेल्या १४ वर्षांपासून महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि गुजरातच्या सीमावर्ती आदिवासी भागात व्यसनमुक्ती जनजागृतीचे कार्य करीत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना नुकताच महाराष्ट्र शासनाचा 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्य रत्न पुरस्कार' प्रदान करण्यात आला होता. पुरस्कारातून मिळालेली एक लाख रुपयांची रक्कम त्यांनी नशामुक्ती अभियानासाठी समर्पित केली आहे.

# सरकारी कांदा खरेदीत पुन्हा घोटाळा होण्याची शक्यता : अनिल घनवट

## ग्राहक व्यवहार मंत्रालयला निवेदन

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** येणाऱ्या काळात कांद्याचे भाव वाढण्याची शक्यता आहे. तेव्हा कांद्याचे भाव नियंत्रित करण्यासाठी सरकार खरेदी करत असलेल्या कांदा खरेदीत पुन्हा मोठा घोटाळा होण्याची शक्यता आहे म्हणून सरकारने कांदा खरेदीची पद्धत बदलावी किंवा कांदा खरेदीच रद्द करावी, असे निवेदन स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी केंद्र शासनाला पाठवले आहे.

सप्टेंबर - ऑक्टोबर महिन्यात कांद्याचे भाव वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन ते नियंत्रित करण्यासाठी सरकारने मूल्य स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत नाशिक जिल्ह्यात दोन लाख टन कांदा खरेदी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. १५८०/- रुपये प्रतिक्विंटल दराने कांदा खरेदी करण्यात येणार आहे. खरेदीत होणारा भ्रष्टाचार टाळण्यासाठी थेट बाजार समितीत कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवार, ८ जून पासून कांदा खरेदीस सुरुवात झाली आहे. मात्र, प्रत्यक्षात कांदा खरेदी होत नाही असे चित्र आहे.

**कृउबातच हवे खरेदी केंद्र**

सरकारने कांदा खरेदी बाजार समितीतच व्हावी, असा निर्णय घेतला असला तरी नाफेड किंवा खरेदी करणारी एजन्सी फक्त बाजार समितीत आपले खरेदी केंद्र सुरू करेल, प्रत्यक्ष लिलावात भाग घेणार नाही. नोंदणी केलेले शेतकरी त्या गाळ्यावर आपला माल घालतील. नंतर त्या कांद्याची छाटणी व प्रतवारी करून नाफेडच्या निकषात बसणारा कांदा स्वीकारला जाईल व नाकारलेला कांदा शेतकऱ्याने परत घेऊन जायचा आहे. स्वीकारलेल्या कांद्याला जास्तीत जास्त १५८०/- रु. क्विंटल प्रमाणे दर देण्यात येईल.

ही सर्व प्रक्रिया अत्यंत किचकट आहे. त्यापेक्षा नाफेडने थेट लिलावात बोली बोलून कांदा खरेदी करावा व नंतर शेतकऱ्याची नोंदणी करून प्रतवारी करावी आणि शेतकऱ्याला पेमेंट करावे. ही सर्व प्रक्रिय सीसीटीव्हीच्या निगरणित व्हावी. सध्याच्या खरेदी प्रक्रियेत मोठा घोटाळा होऊ शकतो.

**माहिती प्रसिद्ध करावी**

मंगळवार, दि. ९ जून रोजी केंद्रीय वखार महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून कांद्याच्या साठ्याची माहिती घेतली असता ४५.२६ टन कांदा साठा असल्याचे सांगण्यात आले. मात्र त्या दिवशी कुठेही, कोणत्याही बाजार समितीत कांदा खरेदी झालेली नव्हती मग हा कांदा आला कोठून? घोटाळा करण्यात सराईत असलेले व्यापारी, स्वस्तात खरेदी केलेला कांदा नाफेडला १५८० रु. दराने सरकारला देण्याची शक्यता आहे. हे टाळण्यासाठी सर्व बाजार समित्यांमध्ये नाफेडसाठी खरेदी केलेल्या कांद्याची माहिती व वखार महामंडळाकडे जमा झालेल्या साठ्याची माहिती प्रसिद्ध करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

खरेदी करणारी संस्था व नाफेड यांच्यावर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक बाजार समितीत, सहकार निबंधक कार्यालय, महसूल विभाग, कृषी विभाग, पणन विभागाचे व बाजार समितीचे कर्मचारी उपस्थित ठेवले जाणार आहेत. शासनाला या कर्मचाऱ्यांच्या पगाराचा खर्च करावा लागणार आहे. इतके करून ही घोटाळा होणारच आहे.

**अन्यथा खरेदी बंद करा**

ज्या गुणवत्तेचा कांदा नाफेडला अपेक्षित आहे. त्या कांद्याला आताच १५८०/- रु. पेक्षा जास्त दर मिळत आहे. खरी गरज आहे ती कमी गुणवत्तेच्या कांद्याला दर देण्याची. ते जर सरकार करू शकत असेल तर सरकारने कांदा खरेदी करावी अन्यथा सरकारी कांदा खरेदी बंद करावी अशी मागणी स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी ग्राहक व्यवहार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या कडे केली आहे.

# विकासाच्या नावाखाली गावपण हरवू देऊ नका" – विलास गावंड यांचे आवाहन

## घरोघरी जाऊन तसेच सोशल मीडियाद्वारे विलास गावंड करीत आहेत जनजागृती

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** ग्रामीण भागातील शेतजमिनी, पर्यावरण आणि सामाजिक जीवनावर वाढत्या नागरीकरणाचा होणारा परिणाम लक्षात घेता, सामाजिक कार्यकर्ते विलास गावंड यांनी ग्रामस्थांना जागृत राहण्याचे आणि आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठी संघटित होण्याचे आवाहन केले आहे.

ग्रामस्थांशी संवाद साधताना विलास गांवड म्हणाले की, आपल्या पूर्वजांनी अथक परिश्रमातून निर्माण केलेल्या सुपीक शेतजमिनी, आज विकासाच्या नावाखाली हस्तगत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र या जमिनी केवळ मालमत्ता नसून त्या आपल्या संस्कृतीचा, परंपरेचा आणि उपजीविकेचा आधार आहेत. त्यामुळे कोणताही विकास आराखडा राबविताना स्थानिकांच्या हिताचा आणि पर्यावरणाचा विचार होणे आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की, मोठे महामार्ग, उंच इमारती आणि नागरी सुविधा यांनाच विकासाचे मोजमाप मानणे योग्य नाही. खरा विकास तोच, जो माणसाला आनंद, सुरक्षितता आणि स्वावलंबन देतो. आज शहरांमध्ये राहणारे अनेक लोक शांतता,



स्वच्छ हवा आणि निसर्गाच्या शोधात ग्रामीण भागाकडे येत आहेत. अशा वेळी गावातील नैसर्गिक संपत्ती आणि जीवनमूल्ये जपण्याची जबाबदारी आपलीच आहे.

विलास गांवड यांनी गावांच्या सामाजिक रचनेकडेही लक्ष वेधले. "गाव म्हणजे केवळ घरांची वस्ती नसते. तेथे नातेसंबंध, जिव्हाळा, परस्पर सहकार्य आणि सामाजिक बांधिलकी असते. संकटाच्या काळात शेजारी धावून येतो, सुख-दुःखात संपूर्ण गाव सहभागी होते. हीच ग्रामीण संस्कृतीची खरी ताकद आहे. नागरीकरणाच्या वेगात ही मूल्ये हरवू नयेत," असे त्यांनी सांगितले.

शेती, मच्छीमारी, भाजीपाला आणि फळबागा या ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या प्रमुख आधारस्तंभ असल्याचे सांगत त्यांनी पुढील पिढ्यांच्या भविष्याबाबत चिंता व्यक्त केली. "आज आपण ज्या जमिनीवर उभे आहोत, तीच उद्याच्या पिढ्यांची उपजीविका आहे. जमीन गेली तर केवळ मालमत्ता नाही, तर स्वावलंबनाची संधीही नष्ट होईल," असे ते म्हणाले.

विकासाला विरोध नसून तो पर्यावरणपूरक, लोकाभिमुख आणि शाश्वत असावा, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. ग्रामस्थांनी जागरूक राहून विकास योजनांची माहिती घ्यावी, पर्यावरणीय परिणाम समजून घ्यावेत आणि आपल्या हक्कांसाठी लोकशाही मार्गाने एकत्र यावे, असे आवाहन त्यांनी केले.

# अतुल सावे यांच्या औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवडीचे स्वागत; मान्यवरांकडून अभिनंदन

**छत्रपती संभाजीनगर :** औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या अध्यक्षपदी राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांची निवड झाल्याबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. अभिषेक देशमुख, गब्बर ॲक्शन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मकसूद अंसारी, चेतन तायडे तसेच माजी नगरसेवक राहुल खरात यांनी अतुल सावे यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.



यावेळी मकसूद अन्सारी यांनी सांगितले की, अतुल सावे यांना प्रशासकीय आणि राजकीय क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली औरंगाबाद जिल्हा क्रिकेट असोसिएशन अधिक सक्षमपणे कार्य करेल आणि जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील क्रिकेटपटूंना नवी संधी उपलब्ध होईल. क्रिकेटच्या विकासासाठी त्यांनी दूरदृष्टी ठेवून काम करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. अतुल सावे हे महाराष्ट्र शासनात कॅबिनेट मंत्री असून त्यांच्या अखत्यारीत इतर मागासवर्गीय (ओबीसी) व बहुजन कल्याण, दुग्धविकास, नवीन व नवीकरणीय ऊर्जा तसेच दिव्यांग कल्याण यांसारखी महत्त्वाची खाती आहेत. याशिवाय ते नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही जबाबदारी सांभाळत आहेत. त्यांच्या निवडीमुळे जिल्ह्यातील क्रिकेट क्षेत्राला नवी दिशा मिळेल, युवा खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल आणि क्रीडा सुविधांच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास अभिनंदन करणाऱ्या मान्यवरांनी व्यक्त केला आहे.

# स्वाधार योजनेसाठी शासकीय वसतिगृह अर्ज सक्तीचा

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या लाभासाठी शासनाने महत्त्वपूर्ण बदल केला आहे. चालू शैक्षणिक वर्षापासून स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करणे सक्तीचे करण्यात आले आहे.

शासनाच्या नव्या निर्देशानुसार, विद्यार्थ्यांना थेट स्वाधार योजनेसाठी अर्ज करता येणार नाही. यासाठी प्रथम शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळविण्यासाठी ऑनलाइन अर्ज सादर करावा लागणार आहे. गुणवत्तेनुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला जाईल. मात्र, जागेअभावी किंवा गुणवत्तेच्या निकषांमुळे प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांनाच स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

समाज कल्याण विभागाने स्पष्ट केले आहे की, वसतिगृहासाठी अर्ज न करणारे विद्यार्थी वसतिगृह तसेच स्वाधार या दोन्ही योजनांच्या लाभापासून वंचित राहू शकतात. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहे उपलब्ध नाहीत, तेथे या नियमात शिथिलता देण्यात आली असली तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाने केले आहे.

**मागील परीक्षेत ५० टक्क्यांहून अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना** https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. शालेय अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३० जून २०२६ असून, इयत्ता ११ वी, १२ वी तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १५ जुलै २०२६ पर्यंत अर्ज स्वीकारले जाणार आहेत.

# राष्ट्रवादीच्या वर्धापनदिनी मुंबईत 'तुतारी'चा गजर, उरणच्या भावनाताईंचा सन्मान!

## शरद पवारांनी फुंकली निवडणुकीची रणशिंग

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाचा २७ वा वर्धापन दिन मंगळवारी १० जून रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे कार्यकर्त्यांच्या प्रचंड उत्साहात साजरा झाला. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार, कार्याध्यक्षा खासदार सुप्रियाताई सुळे आणि प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत उरणच्या नगराध्यक्ष भावनाताई घाणेकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या हस्ते भावनाताई घाणेकर यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



शरद पवार यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत उरण शहराच्या विकासासाठी, महिला सक्षमीकरणासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सतत कार्यरत असणाऱ्या भावनाताई घाणेकर यांच्या कामाची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतली. यावेळी मार्गदर्शन करताना शरद पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के जागा महिलांना देण्याचा धोरणात्मक निर्णय जाहीर केला आणि भावनाताई घाणेकर यांचा सत्कार हा याच महिला धोरणाचा भाग असल्याचे मानले जात आहे. "भगिनींना संधी मिळाली तर त्या कर्तृत्व दाखवू शकतात, ऑपरेशन सिंदूरबाबत दोन महिलांनी माहिती देऊन हे सिद्ध केले," असे पवार म्हणाले. पक्षामध्ये फूट पडली असली तरी विचाराने राहिलेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचे पवारांनी कौतुक केले आणि "जे राहिले ते विचाराने राहिले, तुमच्यासारखे कार्यकर्ते एकसंघ राहून विचारांना पुढे नेतील तर सत्ता आपोआप येईल" असा विश्वास व्यक्त केला. भावनाताई घाणेकर यांच्या सत्काराने उरण शहरातील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून "शरद पवार साहेबांच्या हस्ते उरणच्या लेकीचा सन्मान झाला, हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे," अशा प्रतिक्रिया कार्यकर्त्यांनी दिल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षाचे चिन्ह 'तुतारी फुंकणारा माणूस' आहे. आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील हा वर्धापन दिन सोहळा आणि शरद पवार यांचे भाषण महत्त्वाचे मानले जात असून राज्यभरातून कार्यकर्ते मोठ्या संख्येने मुंबईत उपस्थित होते.

# "कोकण रेल्वे भरती: वॉक-इन मुलाखती महाराष्ट्रातच घ्या, अन्यथा आंदोलन"; मनसेचा KRCL ला इशारा

दै हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण /रायगड :** कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड (KRCL) मार्फत ८ जून ते ३० जून २०२६ या कालावधीत १७ प्रकारच्या १५० तांत्रिक पदांसाठी कंत्राटी तत्त्वावर वॉक-इन मुलाखतीद्वारे भरती प्रक्रिया राबवली जात आहे. या भरतीच्या मुलाखती महाराष्ट्राबाहेर घेतल्यास महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांवर अन्याय होईल, असा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या मुलाखती मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथेच घेण्याची मागणी केली आहे. मनसेचे रायगड जिल्हाध्यक्ष संदेश बाळचंद्र ठाकूर यांनी १० जून २०२६ रोजी KRCL चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक संतोष कुमार झा यांना पत्र पाठवून हा इशारा दिला आहे.

कोकण रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या भरतीमध्ये कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक, गुणवत्ता निरीक्षक, तंत्रज्ञ (वेल्डर, ऑपरेटर, फिटर), वाहन चालक, लिस्ट ऑपरेटर, हायड्रा ऑपरेटर, ऑफिस बॉय/हेल्पर अशा १७ विविध पदांसाठी एकूण १५० जागा कंत्राटी तत्त्वावर भरण्यात येणार आहेत. यासाठी ८ जूनपासून ३० जूनपर्यंत वेगवेगळ्या पदांसाठी वॉक-इन मुलाखती आयोजित केल्या आहेत. या भरतीसाठी ओबीसी, एससी, एसटी व अन्य आरक्षण लागू असून पात्रता निकष व इतर तपशीलासाठी उमेदवारांनी www.konkan-railway.com या वेबसाईटवर अधिसूचना पाहावी, असे प्रशासनाने कळवले आहे.



संदेश ठाकूर यांनी पत्रात म्हटले आहे की, "कोकण रेल्वेचा सर्वाधिक मार्ग महाराष्ट्रातून जातो आणि KRCL चे मुख्यालयही नवी मुंबई, महाराष्ट्रात आहे. असे असताना भरतीसाठीच्या वॉक-इन मुलाखतीची ठिकाणे महाराष्ट्राबाहेर ठेवणे म्हणजे महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगार युवकांना आर्थिक व वेळेचा मोठा फटका बसवण्यासारखे आहे. परराज्यात मुलाखतीला जाण्यासाठी येणारा प्रवासखर्च व वेळ यामुळे अनेक होतकरू मराठी मुलं या संधीपासून वंचित राहतील".

मनसेने या पत्रातून दोन प्रमुख मागण्या केल्या आहेत. पहिली म्हणजे KRCL मधील सदर भरती प्रक्रियेच्या वॉक-इन मुलाखती मुंबई, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग येथे आयोजित कराव्यात. दुसरी मागणी म्हणजे महाराष्ट्रातील उमेदवारांना जास्तीत जास्त संधी मिळावी यासाठी भरती प्रक्रियेत स्थानिक उमेदवारांना प्राधान्य द्यावे. "कोकण रेल्वे ही महाराष्ट्राची अस्मिता आहे. त्यामुळे या भरती प्रक्रियेत महाराष्ट्रातील तरुणांना न्याय मिळावा, ही अपेक्षा आहे. आपण या विनंतीचा सकारात्मक विचार करून योग्य निर्णय घ्यावा," असे ठाकूर यांनी पत्रात नमूद केले आहे.

दरम्यान, मनसेने हे पत्र मनसे अध्यक्ष राजसाहेब ठाकरे, पोलीस आयुक्त नवी मुंबई व मनसे संपर्क अध्यक्ष रायगड यांनाही प्रत माहितीसाठी पाठवले आहे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही मनसेने दिला आहे. त्यामुळे आता KRCL प्रशासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शैक्षणिक परिवर्तनाचा जागतिक मंच आज एमजीएम विद्यापीठात

## माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांच्या हस्ते होणार आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १७ व्या आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय शैक्षणिक परिषदेचे उद्घाटन शुक्रवार, दि.१२ जून २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता एमजीएम विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृह येथे ऋषिहूड युनिव्हर्सिटीचे कुलपती तथा माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू, केंद्रीय ग्राम विकास विभागाच्या सहसचिव रोहिणी भाजीभाकरे, एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, कुलपती





अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर व सर्व संबंधित मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

"शैक्षणिक परिवर्तनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर" या संकल्पनेवर आधारित ही दोन दिवसीय परिषद आयोजित करण्यात आली असून शिक्षण, तंत्रज्ञान, आरोग्य, व्यवस्थापन, अभियांत्रिकी आणि संशोधन क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ, संशोधक, प्राध्यापक आणि धोरणकर्ते यांचा यात सहभाग राहणार आहे.

ही परिषद एमजीएम विद्यापीठ, महाराष्ट्र, भारत; ब्रिजवॉटर स्टेट युनिव्हर्सिटी (बीएसयू), मॅसेच्युसेट्स, अमेरिका; हसन द्वितीय विद्यापीठ, कॅसाब्लांका, मोरोक्को; सिदी मोहम्मद बेन अब्देल्लाह विद्यापीठ (एसएमबीएयू), फेस, मोरोक्को आणि तफिला टेक्निकल युनिव्हर्सिटी (टीटीयू), तफिला, जॉर्डन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## भदंत टेकडीवरील विपश्यना केंद्राचा सुधारित प्रस्ताव तातडीने सादर करा

# हदगाव प्रकल्प महाराष्ट्रातील आदर्श आध्यात्मिक-पर्यटन केंद्र बनविण्याचे मंत्री संजय शिरसाट यांचे निर्देश




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**मुंबई :** नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यातील भदंत टेकडी येथे प्रस्तावित विपश्यना केंद्र आणि अभ्यासिका प्रकल्प महाराष्ट्राच्या आध्यात्मिक, पर्यटन व अध्ययन क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण स्थान निर्माण करू शकतो. या दृष्टीने प्रकल्पातील तांत्रिक बाबींची सखोल तपासणी करून सुधारित प्रस्ताव तातडीने सादर करण्यात यावा, असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

मंत्रालयात भदंत टेकडी येथील विपश्यना केंद्र व अभ्यासिका उभारणीसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस हदगावचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे तसेच नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

यावेळी मंत्री शिरसाट यांनी भदंत टेकडी परिसरात उभारण्यात येणारे विपश्यना केंद्र हे केवळ ध्यानधारणा आणि अभ्यासाचे ठिकाण न राहता राज्यातील नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र बनावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. राज्यभरातील पर्यटक, अभ्यासक आणि आध्यात्मिक साधकांनी आवर्जून भेट द्यावी असे भव्य, आकर्षक आणि दर्जेदार बांधकाम उभारण्यावर त्यांनी भर दिला.

प्रस्तावित प्रकल्प हा राज्यासाठी एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास व्यक्त करताना त्यांनी संबंधित विभागांना आवश्यक तांत्रिक बाबींचा बारकाईने अभ्यास करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर सुधारित आणि सर्वसमावेशक प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यास सांगितले.

बैठकीत प्रकल्पाच्या नियोजनाबाबतही चर्चा करण्यात आली. विपश्यना केंद्र विकसित करताना परिसरातील नैसर्गिक सौंदर्य अबाधित राखणे, पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे आणि आध्यात्मिक वातावरणाला पूरक पायाभूत सुविधा उभारणे यावर विशेष भर देण्यात आला.

भदंत टेकडी येथील प्रस्तावित विपश्यना केंद्र हे भविष्यात राज्यातील एक आदर्श, प्रेरणादायी आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाचे स्थळ म्हणून विकसित व्हावे, अशी अपेक्षा मंत्री शिरसाट यांनी व्यक्त केली.

## जिन्सी पोलिस ठाण्यात बेवारस दुचाकींचा खच; मालकांनी तातडीने संपर्क साधण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** विविध गुन्हे, अपघात आणि तपास प्रक्रियेदरम्यान जप्त करण्यात आलेली तसेच बेवारस अवस्थेत सापडलेली वाहने सध्या जिन्सी पोलिस ठाण्याच्या आवारात पडून आहेत. अनेक वर्षांपासून या वाहनांवर कोणत्याही मालकाने दावा न केल्याने त्यांची अवस्था दिवसेंदिवस खराब होत चालली आहे. पावसाळा सुरू झाल्यामुळे उघड्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर गंज चढू लागला असून अनेक वाहनांचे नुकसान होत आहे. वाहनांची विल्हेवाट लावण्यापूर्वी मूळ मालकांना शेवटची संधी देण्यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष आवाहन जारी केले आहे.वाहनांच्या नोंदणी क्रमांकांच्या आधारे संबंधित मालकांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र अनेक पत्ते बदललेले असल्याने किंवा संपर्क न झाल्याने मालकांपर्यंत पोहोचणे शक्य झाले नाही. त्यामुळे ज्यांच्या दुचाकी हरवल्या आहेत किंवा पोलिसांच्या ताब्यात असल्याची शक्यता आहे, त्यांनी जिन्सी पोलिस ठाण्यात चौकशी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलिसांच्या ताब्यात असलेल्या वाहनांमध्ये MH-20-NQ-9088 होंडा ॲक्टिव्हा, 02-BK-6271 यामाहा एफझेड, MH-20-V-692 बजाज स्कूटर, MVG-2104 टीव्हीएस सुझुकी, MH-28-G-8119 हिरो होंडा स्प्लेंडर, MH-17-Q-4810 यामाहा क्रक्स, MH-20-AZ-3625 हिरो होंडा सीडी डिलक्स, MH-28K-605 टीव्हीएस तसेच MH-20-AD-6199 आणि MH-20-AK-1813 क्रमांकाची वाहने यांचा समावेश आहे. याशिवाय अन्य काही दुचाकी वाहनेही पोलिस ठाण्यात जमा आहेत.

संबंधित वाहन मालकांनी वाहनाची नोंदणी कागदपत्रे, ओळखपत्र व मालकी सिद्ध करणारे आवश्यक पुरावे घेऊन जिन्सी पोलिस ठाण्यात संपर्क साधावा. वाहनाची खातरजमा झाल्यानंतर नियमानुसार वाहन परत मिळू शकणार असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली आहे.

दरम्यान, दीर्घकाळ दावा न केलेल्या वाहनांबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याने वाहन मालकांनी विलंब न करता पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पोषण ट्रॅकरच्या वापराबाबत अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महिला व बाल विकास विभागाच्या वतीने जिल्ह्यातील अंगणवाडी सेविकांना पोषण आहार व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने पोषण ट्रॅकर प्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले. सिल्लोड, फुलंब्री आणि गंगापूर तालुक्यातील निवडक बीटमधील अंगणवाडी सेविकांनी या प्रशिक्षणात सहभाग घेतला.

शासनाकडून अंगणवाडी सेविकांना अँड्रॉइड मोबाईल उपलब्ध करून देण्यात आले असून, त्याद्वारे लाभार्थ्यांची माहिती, पोषण आहाराचे वितरण, बालकांच्या वाढीची नोंद तसेच विविध अहवाल पोषण ट्रॅकर ॲपमध्ये नोंदविले जातात. गावात उपलब्ध असलेल्या मोबाईल नेटवर्कनुसार संबंधित कंपनीचे रिचार्ज खर्चही शासनामार्फत उपलब्ध करून दिले जात आहे.

आज झालेल्या प्रशिक्षणात सिल्लोड तालुक्यातील आमसरी व शिवना बीट, तसेच फुलंब्री आणि गंगापूर तालुक्यातील आंबेलोहळ व जोगेश्वरी बीटमधील अंगणवाडी सेविकांना मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणादरम्यान ॲपचा वापर, माहिती नोंदणी प्रक्रिया, तांत्रिक अडचणींचे निराकरण आणि अहवाल सादरीकरणाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

या प्रशिक्षणामुळे अंगणवाडी स्तरावरील कामकाज अधिक पारदर्शक, अचूक आणि परिणामकारक होण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.

# राष्ट्रीय शल्यचिकीत्सक सप्ताहानिमित्त घाटीत रक्तदान शिबिर

## रक्तटंचाईच्या काळात 27 रक्तदात्यांचा सहभाग; रक्तपेढीला मिळाला दिलासा




हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** उन्हाळा आणि सुट्ट्यांच्या काळात रक्ताचा तुटवडा जाणवत असताना शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथील शल्यचिकीत्साशास्त्र विभाग आणि सर्जिकल सोसायटीच्या वतीने राष्ट्रीय शल्यचिकीत्सक सप्ताहानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. गुरुवारी झालेल्या या शिबिरात २७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून रक्तपेढीला मोलाचा आधार दिला.

देशभरात ९ ते १५ जून हा कालावधी राष्ट्रीय शल्यचिकीत्सक सप्ताह म्हणून साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर आयोजित शिबिराचे उद्घाटन अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते झाले. "रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान" हे सप्ताहाचे ब्रीदवाक्य असून गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

रुग्णालयातील रक्तपेढीमार्फत विविध शस्त्रक्रिया, अपघातग्रस्त तसेच गंभीर रुग्णांसाठी रक्तपुरवठा सातत्याने केला जातो. अशा परिस्थितीत आयोजित रक्तदान शिबिरामुळे रक्तसाठा वाढण्यास मदत झाली.

यावेळी उपअधिष्ठाता तथा विकृतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. भारत सोनवणे, उपअधिष्ठाता डॉ. सुरेश हरबडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुचीता जोशी, शल्यचिकीत्साशास्त्र विभागप्रमुख डॉ. सरोजिनी जाधव, सहयोगी प्राध्यापक डॉ. अंजली कुलकर्णी, डॉ. मनीष मालाणी तसेच महाराष्ट्र सुरक्षा बलाचे सुरक्षा अधिकारी सुरेश भाले उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्जिकल सोसायटीचे सचिव डॉ. पंकज वैरागड यांनी समन्वयाची जबाबदारी सांभाळली. विभागातील निवासी डॉक्टर डॉ. प्रियेश, डॉ. अंजल, डॉ. अमेय आणि डॉ. प्रणव यांनीही विशेष योगदान दिले. शिबिरात प्राध्यापक, निवासी डॉक्टर आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत रक्तदान केले. रक्तपेढीतील बीटीओ आणि कर्मचाऱ्यांनीही शिबिर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

रक्तदानातून समाजसेवेचा संदेश

उन्हाळ्यात रक्तसाठा कमी होण्याची समस्या गंभीर बनते. अशा वेळी वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेत केलेले रक्तदान हे केवळ रक्तपेढीला आधार देणारे नसून समाजाप्रती असलेल्या संवेदनशीलतेचेही उदाहरण ठरले आहे. "रक्तदान हे जीवनदान" हा संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

## पोलीस भरतीचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यावर अकॅडमीत बेल्ट-काठीने मारहाण! छत्रपती संभाजीनगर हादरले

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी :** पोलीस दलात भरती होऊन देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थ्यावरच प्रशिक्षण केंद्रात अमानुष अत्याचार झाल्याची संतापजनक घटना छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडकीस आली आहे. शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थ्याला बेल्ट आणि काठीने बेदम मारहाण करण्यात आल्याचा आरोप असून, या धक्कादायक प्रकारामुळे पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

शहरातील भारत करिअर अकॅडमीत घडलेल्या या घटनेत संबंधित पी.टी. प्रशिक्षक व व्यवस्थापक विवेक डाकणे यांनी किरकोळ कारणावरून अल्पवयीन विद्यार्थ्याला लक्ष्य केल्याचा आरोप आहे. विद्यार्थ्याला वारंवार मारहाण करत त्याचा मानसिक छळही करण्यात आल्याचे समोर आले आहे. या मारहाणीत विद्यार्थ्याला दुखापत झाल्याची माहिती मिळत आहे.

या संपूर्ण प्रकाराला आणखी गंभीर वळण देणारी बाब म्हणजे मारहाणीचे दृश्य सीसीटीव्हीत कैद झाले आहे. फुटेजमध्ये विद्यार्थ्याला मारहाण होत असल्याचे स्पष्ट दिसत असल्याची माहिती समोर येताच खळबळ उडाली. पोलिसांनी हे फुटेज ताब्यात घेतले असून तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली आहेत. घटनेनंतर विद्यार्थ्याच्या नातेवाईकांनी छावणी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. शारीरिक अत्याचारासोबतच रॅगिंगसदृश वागणुकीतून मानसिक छळ केल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी संबंधित प्रशिक्षक आणि व्यवस्थापकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, विद्यार्थ्यांना घडविण्याचा दावा करणाऱ्या प्रशिक्षण संस्थांमध्ये असे प्रकार घडत असतील तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी नेमकी कोण घेणार, असा सवाल आता उपस्थित होत आहे. सीसीटीव्हीतील दृश्यांमुळे प्रकरणाची गंभीरता वाढली असून दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. छावणी पोलीसानी गुन्हा दाखल केला असून उपलब्ध पुराव्यांच्या आधारे पुढील कारवाई करण्यात येणार आहे.

## एक भिंत सुरक्षिततेसाठी संकल्पनेतून कामे आजही चालू : शांतिगिरी महाराज



हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**खुलताबाद :** श्री क्षेत्र वेरूळ या ठिकाणी निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांनी सुरू केलेल्या संस्कृतीचे जतन आणि मूल्यांचे संवर्धन करण्यासाठी गुरुकुल परंपरा सुरू केली. 'श्री क्षेत्र वेरुळ गुरुकुल' हे त्यापैकी पहिले आहे. या

कंपाऊंड वॉल बांधकाम सेवा अभियान श्री.बाबाजींच्या कृपाशीर्वादाने उत्तराधिकारी महामंडलेश्वर १००८ जगद्गुरू स्वामी शांतीगिरीजी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्रेरणेने संपन्न झाले. हा 'एक दिवसीय महाश्रमदान सोहळा' केवळ विटा आणि सिमेंटच्या बांधकामाचा नाही; तर आपली एकता, निस्वार्थ सेवा आणि पराकोटीची गुरुभक्ती एकत्र गुंफणारा एक अलौकिक सोहळा ठरला. गुरुकुलाची कंपाऊंड वॉल (सुरक्षा भिंत) उभारण्याच्या या सेवा अभियानात समाजातील प्रत्येक घटकाचे योगदान मोलाचे ठरले. येथे १०० कुशल कारागीर व १००० सेवक या महा श्रमदान सोहळ्यात सहभागी झाले होते. जेव्हा हजारो हात सेवेच्या भावनेने एकत्र येतात, तेव्हा अशक्य गोष्टीही शक्य होतात.बाबाजींच्या चरणी सेवा अर्पण करताना केवळ बांधकाम नाही, तर एकता, सेवा आणि गुरुभक्तीचा दिव्य संकल्प वेरूळ या ठिकाणी दिसून आला.

## उद्योगांच्या सहभागातून आयटीआय होणार हायटेक; पीएम सेतू योजनेतून 3 हजार विद्यार्थ्यांना लाभ

**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी :** जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (आयटीआय) आधुनिक तंत्रज्ञान, उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि रोजगारक्षम कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सेतू (पीएम सेतू) योजनेची अंमलबजावणी सुरू झाली आहे. या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील पाच आयटीआयची निवड करण्यात आली असून सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना अत्याधुनिक कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ मिळणार आहे. विशेष म्हणजे उद्योग क्षेत्राच्या थेट सहभागातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या गरजांशी सुसंगत प्रशिक्षण देण्यावर भर दिला जाणार आहे.

यासंदर्भात बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक पार पडली. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस सहसंचालक व्यवसाय शिक्षण प्रदीप दुर्गे, उपसंचालक रमण पाटील, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी अभिजीत आलटे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य सत्यभूषण गोसावी यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. केंद्र पुरस्कृत पीएम सेतू योजनेचा मुख्य उद्देश औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे उन्नतीकरण करून त्यांना आधुनिक, उद्योगाभिमुख आणि रोजगारक्षम कौशल्य विकास केंद्रांमध्ये रूपांतरित करणे हा आहे. बदलत्या औद्योगिक गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योगांना आवश्यक असलेली कौशल्ये मिळावीत, यासाठी अभ्यासक्रम, प्रशिक्षण सुविधा आणि तांत्रिक संसाधनांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था छत्रपती संभाजीनगर, पैठण, गंगापूर, फुलंब्री आणि खुलताबाद या पाच संस्थांचा समावेश असलेला एक क्लस्टर विकसित करण्यात येणार आहे. या सर्व संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांना सुधारित प्रशिक्षण सुविधा, आधुनिक उपकरणे आणि उद्योगांशी संलग्न कौशल्य विकास कार्यक्रमांचा लाभ मिळणार आहे. योजनेसाठी आवश्यक निधीमध्ये केंद्र शासनाचा ५० टक्के, राज्य शासनाचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के वाटा असणार आहे. सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून प्रशिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासह विद्यार्थ्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

जिल्ह्यात पहिल्या टप्प्यात उन्नतीकरणासाठी निवड झालेल्या आयटीआयमध्ये आवश्यक पायाभूत सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. त्यानंतर उद्योग क्षेत्राचा अधिकाधिक सहभाग मिळविण्यासाठी एमआयडीसी, जिल्हा उद्योग केंद्र तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्या माध्यमातून संयुक्त प्रयत्न करण्यात येणार आहेत.

बैठकीत उद्योगांशी प्रभावी समन्वय निर्माण करण्यावर विशेष भर देण्यात आला. उद्योगांना आवश्यक असलेल्या कौशल्यांचा अभ्यास करून त्यानुसार रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करण्यात येतील. विद्यार्थ्यांना केवळ सैद्धांतिक नव्हे तर प्रत्यक्ष उद्योगांमध्ये उपयुक्त ठरणारे प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी वाढविण्याचा योजनेचा उद्देश असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. पीएम सेतू योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यातील आयटीआय शिक्षणाला नवे स्वरूप मिळणार असून उद्योग आणि शिक्षण संस्थांमधील दुवा अधिक मजबूत होणार आहे. परिणामी स्थानिक उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# राज्य हँडबॉल स्पर्धेसाठी संभाजीनगरचा संघ सज्ज; वेदांत घुलेकडे कर्णधारपद; 12 ते 14 जूनदरम्यान विभागीय क्रीडा संकुलात रंगणार राज्यस्तरीय सामने



### संभाजीनगरचा राज्यस्तरीय संघ

**वेदांत घुले (कर्णधार), संविधान निकाळजे (उपकर्णधार), समर्थ साळुंखे, अभिनव गायके, सम्यक इंगळे, मयूर गायकवाड, स्वामी जोरे, रितेश जाधव, हर्ष गायकवाड, अनुराग तेलुरे, कृतार्थ साठे, अथर्व नाईकवाडे, आर्यन मगरे, आदर्श गायकवाड, सम्यक म्हस्के, अथर्व वाणी.**

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा येथे १२ ते १४ जूनदरम्यान होणाऱ्या १५ वर्षांखालील मुलांच्या राज्यस्तरीय हँडबॉल स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा संघाची घोषणा करण्यात आली आहे. राज्यभरातील २५ हून अधिक संघांच्या सहभागामुळे स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून यजमान म्हणून संभाजीनगर संघाकडून दमदार कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

संघाच्या कर्णधारपदी वैजापूरच्या वेदांत घुले यांची निवड करण्यात आली असून संविधान निकाळजे यांच्याकडे उपकर्णधारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संघात समर्थ साळुंखे, अभिनव गायके, सम्यक इंगळे, मयूर गायकवाड, स्वामी जोरे, रितेश जाधव, हर्ष गायकवाड, अनुराग तेलुरे, कृतार्थ साठे, अथर्व नाईकवाडे, आर्यन मगरे, आदर्श गायकवाड, सम्यक म्हस्के आणि अथर्व वाणी यांचा समावेश आहे.

संघाचे प्रशिक्षक म्हणून अश्वजीत गायकवाड तर संघ व्यवस्थापक म्हणून अमित प्रधान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मागील काही आठवड्यांपासून खेळाडूंनी नियमित सराव करून स्पर्धेची कसून तयारी केली असून राज्यस्तरावर उल्लेखनीय यश मिळविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

संघाची निवड छत्रपती संभाजीनगर जिल्हा हँडबॉल संघटनेच्या निवड समितीमार्फत करण्यात आली. या युवा खेळाडूंमध्ये राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावर चमकदार कामगिरी करण्याची क्षमता असल्याचा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

संघटनेचे अध्यक्ष तथा माजी आमदार श्रीकांत जोशी, स्पर्धेचे मुख्य समन्वयक अजिंक्य सावे, राज्य हँडबॉल संघटनेचे सहसचिव पंकज भारसाखळे, जिल्हा संघटनेचे सचिव डॉ. सत्यजित पगारे यांच्यासह संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी संघाला शुभेच्छा देत स्पर्धेसाठी उत्साहवर्धन केले.

## घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामे गतीने पूर्ण करा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामे गतीने पूर्ण करा, असे निर्देश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी वेरूळ ता. खुलताबाद येथे दिले.

जिल्हाधिकाऱ्यांनी वेरूळ येथील मालोजीराजे भोसले यांच्या गढीला भेट दिली. शहाजीराजे भोसले स्मारकाची पाहणी केली. वेरूळ येथे सुरू असलेल्या घृष्णेश्वर मंदिर विकास आराखड्यातील कामांची पाहणी करून विकास कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम., अप्पर जिल्हाधिकारी संभाजी अडकूने, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपविभागीय अधिकारी संतोष गोरड, तहसीलदार संतोष गुट्टे, नायब तहसीलदार सुभाष पांढरे,सहाय्यक गटविकास अधिकारी हणमंत बोयनर, गटशिक्षणाधिकारी श्रद्धा ताटे, विस्तार अधिकारी विलास केवट, दीपक बागुल, मंगेश शिंदे, प्रतिभा कांबळे, आरोग्य पर्यवेक्षक बी के चव्हाण, मंडळ अधिकारी विजय चव्हाण, ग्राम महसूल अधिकारी भूषण रोजेकर, ग्रामपंचायत अधिकारी गंगाधर गायकवाड, पोलीस पाटील रमेश ढिवरे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वेरूळ भेटी प्रसंगी जिल्हाधिकारी गौडा यांनी जनगणनेच्या कामाची पाहणी करून आढावा घेतला. वेरूळ येथे तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ग्रामस्थांशी संवाद साधला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911